**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स दास ऑफशोअर लिमिटेड यांच्या राजपुरी खाडी, गट नं. ७० ते ८३ आणि ९६, मुक्काम-रोहिणी गाव, पोस्ट-मेंदडी, तालुका-म्हसळा, जिल्हा-रायगड-४०२१०५, महाराष्ट्र येथील कार्यरत प्रकल्पात विद्यमान सुविधा (Fabrication Yard) विस्तार (जहाज इमारत बांधणी आणि जहाज दुरुस्ती-शिपयार्ड) उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी बाबतचा इतिवृत -**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स दास ऑफशोअर लिमिटेड यांच्या राजपुरी खाडी, गट नं. ७० ते ८३ आणि ९६, मुक्काम - रोहिणी गाव, पोस्ट - मेंदडी, तालुका- म्हसळा, जिल्हा-रायगड - ४०२१०५, महाराष्ट्र येथील कार्यरत प्रकल्पात विद्यमान सुविधा (Fabrication Yard) विस्तार (जहाज इमारत बांधणी आणि जहाज दुरुस्ती - शिपयार्ड) उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार दिनांक, १७ मार्च , २०२३ रोजी दुपारी ०१.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती .

सौ. इंदिरा गायकवाड, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, तथा समन्वयक पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी डॉ. पद्मश्री बैनाडे, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड-अलिबाग तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती, श्री. विद्यासागर किल्लेदार, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रायगड तथा सदस्य पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रर्वतकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण विषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी, स्थानिक शेतकरी व मोठया संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक ०१ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे

बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

समन्वय पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स दास ऑफशोअर लिमिटेड यांचा त्यांच्या राजपुरी खाडी, गट नं. ७० ते ८३ आणि ९६, मुक्काम - रोहिणी गाव, पोस्ट - मेंदडी, तालुका-म्हसळा, जिल्हा - रायगड ४०२ १०५, महाराष्ट्र येथील कार्यरत प्रकल्पात विद्यमान सुविधा (Fabrication Yard) विस्तार (जहाज इमारत बांधणी आणि जहाज दुरुस्ती - शिपयार्ड) उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग - अ ७ (ई) (पोर्ट आणि हार्बर) या वर्गात मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी माहिती देणे, प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागातील, तज्ञ समितीस प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर केला व त्या अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक ३०/१२/२०२१ रोजी प्रदान केली आहे.

जिल्हाधिकारी, रायगड – अलिबाग यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास शुक्रवार दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी दुपारी ०१.०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य

सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४/०९/२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१/१२/२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्र. १७ / २०२३, द्वारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लयुपीसी/पीएच/बी-२३०२०९-एफटीएस-०१६५ दिनांक ०९/०२/२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, रायगड – अलिबाग, **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
( अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई- **सदस्य**
यांचे प्रतिनिधी.रायगड-प्रादेशिक अधिकारी ,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ,
रायगड भवन, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

३) उप प्रादेशिक अधिकारी ,- **समन्वयक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सामुहिक सुविधा केंद्र,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसर,
महाड, जिल्हा-रायगड

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सागर यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एकस्प्रेस यात इंग्रजीत सदरहू प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीबाबत आणि ऑनलाईन लिंकबाबत जाहिर सूचना

दि .०६ फेब्रुवारी, २०२३ रोजी प्रकाशित केलेली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल, मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळ मजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपुर,

२) जिल्हाधिकारी कार्यालय रायगड – अलिबाग.

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र रायगड-अलिबाग.

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रायगड- अलिबाग.

५) तहसीलदार, तहसील कार्यालय-म्हसळा, जिल्हा-रायगड.

६) गटविकास अधिकारी,पंचायत समिती,म्हसळा, जिल्हा-रायगड.

७) मुख्याधिकारी, म्हसळा नगरपंचायत, तालुका-म्हसळा, जिल्हा-रायगड.

८) ग्रुप ग्रामपंचायत कार्यालये-रोहिणी/आडी ठाकूर, ग्रामपंचायत कार्यालय-तुरुंबाडी/काळसुरी/वारळ/हरवित.

९) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग ,नवीन प्रशासकीय इमारत ,महाराष्ट्र शासन , १५ वा मजला, मंत्रालय ,मादाम कामा मार्ग, मुंबई – ४०० ०३२.

१०) सहसंचालक, (जल प्रदुषण नियंत्रण) मुख्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ कल्पतरू पॉईंट, ३ रा मजला ,पीव्हीआर सिनेमा समोर, शिव- माटुंगा स्कीम रोड नं . ८, शीव (पूर्व) , मुंबई.०२२ ४०० -

११) सहसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, रायगड भवन, ६ वा मजला, कोकण भवन विस्तार, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई– ४०० ६१४.

१२) सह मुख्य विस्फोटक निरिक्षक, अ-१ व अ-२ विंग, ५ वा मजला, सीजीओ कॉम्प्लेक्स, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई– ४०० ६१४.

१३) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला,

सेक्टर ११,सीबीडी बेलापूर, नवी मुंबई– ४०० ६१४.

१४) उप प्रादेशिक कार्यालय– महाड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,सी.एफ.सी. बिल्डिंग,एमआयडीसी परिसर, महाड जिल्हा-रायगड – ४०२ ३०९.

१५) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पा विषयी उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड यांना दोन पत्रे ईमेलव्दारे प्राप्त झालेली असून त्याची नोंद घेण्यात आलेली आहेत.

समन्वयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

त्यांनी सांगितले की ही समिती फक्त लोकांचे मत, सुचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून कोणताही निर्णय व शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. सदरहु सुचना / आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफीत, बैठकीत उपस्थित सुचना, आक्षेप, प्रप्त झालेल्या लेखी सुचना यांची नोंद घेवुन प्रकल्प प्रवर्तकांना सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांना सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी मा. अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत सविस्तर माहिती दिली.

त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापनासाठी एकुण भांडवली गुंतवणूक रुपये २.०० कोटी आहे. तर कारखान्यासठी आवर्ती खर्च रु. ४०.०० लाख एवढा प्रती वर्षी आहे. प्रकल्पात पर्यावरण देखभालसाठी दर वर्षी रुपये १५.०० लाख राखीव ठेवले असून प्रकल्पाच्या सीईआर निधीसाठी एकूण ८१.०० लाख रुपयांची तरतुद करण्यात आलेली आहे.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सुचना, आक्षेप, टिकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आले. पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की, प्रकल्पाबाबत आपल्या पर्यावरण विषयक विचार, सुचना व आक्षेप आहेत, त्या थोडक्यात मांडाव्यात. सुचना किंवा आक्षेप नोंदविताना आपले नाव व गावाचे नाव सांगण्यात यावे.

**खालील व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रर्वतक / पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती:-**

**१. श्री. मुश्ताक इस्माईल पारकर, राहणार– हारवित गाव, तालुका- श्रीवर्धन, जिल्हा– रायगड :-**

मी शासन, कंपनी व्यवस्थापन यांचे आभार मानतो की ही जनसुनवणी येथे आयोजित करण्यात आलेली आहे. बैठकीत असे सांगण्यात आले की सदरहू जनसुनावणीच्या बैठकीबाबत सर्व माहिती ही स्थानिक ग्रामपंचायतीस उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. मात्र आमच्या ग्रामपंचायतीस या प्रकल्पाविषयी काहीही माहिती उपलब्ध नाही. ग्रामपंचायतीने या प्रकल्पाबाबत कुठलाही ठराव मंजूर केलेला नाही. ग्रामस्थांना सदरहू प्रकल्पाविषयी काहीही माहिती नाही. तरी आपणाकडे असलेल्या माणुसकी/विशालता लक्षात घेऊन स्थानिकांना प्रकल्पाविषयी सर्व माहिती देण्यात यावी ही नम्र विनंती.

सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प सल्लागार यांना सूचना केली की संबंधित व्यक्तीने स्थानिकांना प्रकल्पाविषयी काहीही माहिती नाही असे मत मांडले आहे. तरी ती देण्यात यावी.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा विस्तारित प्रकल्प आहे. प्रकल्पात फॅब्रिकेशन यार्ड हे अगोदरच पासूनच अस्तित्वात आहे. त्याचा विस्तार करण्यात येणार आहे. म्हणजे येथे जहाज बांधणी व दुरुस्तीचा प्रकल्प येणार आहे. तरी नविन जहाज बांधणी करण्याच्या ज्या सुविधा कराव्या लागतील, त्या सर्व विकसित करण्यात येणार आहेत. त्यानुसार येथे रॅम्प करण्यात येईल व जमिनीवर बोटी आणून त्याची बांधणी किंवा दुरुस्ती करण्यात येणार आहे.

यावेळी, मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की प्रकल्पामुळे किती रोजगार उपलब्ध होतील याची माहिती संबंधित व्यक्तीस हवी आहे, तरी ती माहिती देण्यात यावी.

त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की बांधकाम टप्प्यात १०६ लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध होतील, तर प्रकल्प कार्यन्वित झाल्यानंतर सुमारे ७०० लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

**२. श्री. मलिक युनूस अहमद दवनाक, राहणार— हारवित गाव, पोस्ट-कुडगाव, तालुका- श्रीवर्धन, जिल्हा— रायगड:-**

ह्या जनसुनावणची माहिती अद्याप पावेतो आमच्या गावाला मिळालेली नाही. तरी त्यामुळे आमच्या गावाला जनसुनवणीची माहिती नसल्याने, सदरहू जनसुनावणी ही आम्हांला बंधनकारक नाही. दुसरी गोष्ट म्हणजे येथे बंदर झालेले असून दिघीलासुध्दा बंदर झालेले आहे. त्यामुळे सर्व पाणी हे आमच्या हारवित गावामध्ये येते. येथे खारे पाणी जास्त येत असल्याने आमची शेती नष्ट झालेली आहे. येथील सर्व बोअरवेल्ससुध्दा खारे होण्याचा

धोका आहे. या प्रकल्पामुळे आमच्या गावाला काहीही फायदा झालेला नाही. कंपनीने गावाला सामाजिक सुविधा देण्यासाठी एकही रुपया खर्च केलेला नाही. स्थानिकांसाठी विकासासाठी खर्च करु असे फक्त जनसुनावणीत सांगण्यासाठी असते. प्रत्यक्षात काहीही करत नाहीत.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर येथील स्थानिक व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात जनतेच्या माहितीसाठी जाहिर सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती.

त्याचप्रमाणे, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांश अहवाल मराठी व इंग्रजीत प्रकल्प स्थानाच्या ग्रामपंचायत रोहीणी, आदीठाकुर, तुरूंबाडी, काळसुरी, वारळ व हरवीत येथे ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेला होता. जनसुनावणीची माहिती स्थानिक जनतेस होण्यासाठी गावात सूचना/दवंडी देण्याची सूचना म. प्र. नि. मंडळातर्फे करण्यात आलेली होती, व त्यानुसार दवंडी काल देण्यात आलेली आहे.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की हारवित गावासाठी जे काही सामाजिक कार्य कंपनीने केलेले आहे, त्याची माहिती प्रकल्पाचे प्रतिनिधी यांनी दयावी.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प विस्तारिकरणामुळे रोजगाराची संधी प्राप्त होणार आहे. त्याचप्रमाणे स्थानिकांना सक्षम करण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे जहाज बांधणी कौशल्य स्थानिकांना मिळणार आहे. स्थानिकांना विकासाची संधी मिळणार आहे.

येथे मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत प्रदर्शित केले की संबंधित व्यक्तीस कंपनीच्या सीएसआर व सीईआर निधीच्या तरतुदींबाबत माहिती हवी आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की या प्रकल्पाच्या माध्यामातून विविध समाजोपयोगी सुविधा उपलब्ध करुन देणार आहोत. त्यासाठी ८१.०० लाख रुपयांची तरतुद करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत रुग्णवाहिका व वैदकीय सुविधा उपलब्ध करुन देणार आहोत. पाणी पुरवठ्याची सोय केलेली आहे. त्याचप्रमाणे भविष्यात स्मशानभूमीचे नुतनीकरण करण्यात येईल. व्यायामशाळा विकसित करण्यात येईल. सार्वजनिक स्वच्छता गृहे बांधण्यात येतील.

मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागार यांनी सूचना केली की सीएसआर निधीची किती तरतुद केलेली आहे व दरवर्षी किती खर्च करण्यात येईल याची माहिती द्यावी.

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की शासनाच्या निर्देशांनुसार सीएसआर निधीची तरतुद करण्यात येऊन परिसरातील त्या त्या गावातील आवश्यक असणा-या सामाजिक विकास कामांसाठी निर्देशांप्रमाणेच खर्च करण्यात येईल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सीएसआर म्हणजे व्यवसायिक सामाजिक जबाबदारी निधी (Corporate Social Responsibility Fund– CSR Fund) हा दरवर्षी कंपनीस होणा-या नफ्याच्या २.० % खर्च हा परिसरातील गावांमध्ये सामाजीक विकास कामांसाठी खर्च करावा लागतो उदा. शाळा बांधणे, शाळांमध्ये शौचालये बांधणे, गावातील रस्ते, पाणीपुरवठा योजना, आरोग्य सुविधा, बालोद्यान इ. साठी खर्च करावा लागतो.

तसेच सीईआर म्हणेज व्यवसायिक पर्यावरण जबाबदारी निधी (Corporate Environment Responsibility Fund - CER Fund) बंधनकारक असून एकुण गुंतवणुकीच्या २% इतकी रक्कम सीईआर निधी अतंर्गत जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली विविध पर्यावरणीय योजना परिसरातील गावांमध्ये राबविणे, हरित पट्टा विकास इ. साठी खर्च करावा लागतो.

सदस्य यांनी सांगितले की सीएसआर व सीईआर हे दोन्ही निधी वेगळे असून सीएसआर निधीत दरवर्षी कंपनीस होणा-या नफ्याच्या २.०% खर्च हा परिसरातील गावांमध्ये सामाजीक विकास कामांसाठी खर्च करावा लागतो. तरी आतापर्यंत आपण परिसरातील गावात किती खर्च केला याची माहिती उपस्थितांना सांगावी.

त्यावेळी मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की येथे प्रथम ग्रामपंचायतीने मागणी करणे आवश्यक आहे. कोणी वैयक्तिक मागणी केली तर कंपनीस ती पूर्ण करता येत नाही. ग्रामपंचायतीने तसा प्रस्ताव कंपनीस द्यावा. कंपनी त्या विकासकामाचा निधी ग्रामपंचायतीस वर्ग करते. त्या निधीतून ग्रामपंचायतीस विकास कामे करता येतील.

त्याचप्रमाणे जो सीईआर निधी खर्च करावायचा असतो, त्यास मा. जिल्हाधिकारी यांची पूर्वमान्यता घेऊन जो सीईआर निधी जो पहिल्या पाच वर्षांसाठी असतो, तो ग्रामपंचायत, पंचायत समिती,जिल्हा परिषद यांचा प्रस्ताव घेऊन त्यास मा. जिल्हाधिकारी यांनी मान्यता दिलेला प्रस्तावांना सीईआर निधी खर्च करावयाचा असतो.

**३. श्री बाळकृष्ण बाळू अनाजी. मुक्काम– तुरुंबाडी, पोस्ट– मेंदडी, तालुका- म्हसळा, जिल्हा- रायगड:-**

चर्चेमध्ये सीएसआर निधीबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. तुरूंबाडी गावात प्रचंड पाणीटंचाई आहे. कंपनीस पाणीपुरवठा योजनेबाबत मागणी केल्यास कंपनी

तुरुंबाडी गावास सांगते की बोराईचा माळ आहे, त्या माळावर कंपनीस वसाहत करायची आहे. त्यास ना हरकत प्रमाणपत्र अदा करण्यात यावे, नंतरच गावातील सामाजिक सुविधांबाबत विचार करण्यात येईल. किंवा तुम्ही पर्यायी जागा दाखवा व त्यास ना हरकत प्रमाणपत्र अदा करण्यात यावे. तुरूंबाडी ग्रामस्थांनी कंपनीच्या धरणातून पाणी मागितले होते. कारण येथे अशी परिस्थिती आहे की मेंदडी धरणातील जे पाणी आहे, तेथे त्यांची सतत दुरुस्ती चालू असते. महिन्यात १५ दिवस पाणी मिळत नाही.

तरी माझी विनंती आहे की, तुरुंबाडी गावास या प्रकल्पाचा सर्वात जास्त पर्यावरणीय आघात होणार आहे. कंपनीने रोहिणी, अदिठाकूरगावाला पाणी दिलेले आहे. तसेच तुरूबाडी गावाला पाणी पुरविण्याचे सहकार्य केल्यास तुरूबाडी गावही प्रकल्प व्यवस्थापनाबरोबर सहकार्य करेल.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की तुरूंबाडी गावाच्या प्रश्नासाठी सर्व ग्रामपंचायत सदस्यांबरोबर चर्चा करुन त्यावर तोडगा काढण्यात येईल.

मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याची सूचना केली.

**४. श्री चंद्रकांत लक्ष्मण बेडेकर, राहणार-काळसुरी गांव, पोस्ट-मेंदडी, तालुका-म्हसळा, जिल्हा- रायगड:-**

बैठकीत प्रस्तावित प्रकल्प व भविष्यात गावात पुरविण्यात येणा-या सुविधांबाबत माहिती कळली. प्रकल्प सुरु झाल्यापासून फक्त रोहिणी ग्रामपंचायतीस प्रकल्पाचा फायदा झालेला असून दुस-या गावांना आडी ठाकूर, तुरुंबाडी/काळसुरी/वारळ/हारवित या गावांना काहीही फायदा झालेला नाही.

प्रकल्प विस्तारिकरण होत आहे, तर परिसरात जे तरुण तरुणी आहेत, त्यांना रोजगाराची संधि देऊन त्यांना नियमाप्रमाणे वेतनश्रेणी मिळावी हीच आमची मागणी आहे. येथे नोकरी व नोकरी मिळाल्यास वेतनश्रेणी महिन्यास मिळावी. ती मिळत नसल्याने येथील तरुण तरुणींना गाव सोडून मुंबई,पुण्यास कामासाठी जावे लागते. येथील स्थानिकांच्या जमिनी घेऊन येथे कंपन्या उभ्या राहिलेल्या आहेत. तरी या प्रकल्याचा फायदा स्थानिकांना, गरिब जनतेस व्हावा हीच अपेक्षा.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आपल्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली असून त्याबाबत निश्चितच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

त्यांनी उपस्थितांना सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

याठिकाणी श्री पारकर व श्री मलिक यांनी मत मांडले की प्रकल्पाविषयी जी माहिती दिली, त्याबद्दल आभारी आहोत. त्यांनी पुढे मत मांडले की सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे येथील स्थानिकांना प्रशिक्षण, रोजगार व वेतनश्रेणी देणार असाल, तसेच परिसरातील गावांमध्ये विविध सामाजिक सुविधा विकसित करणार असाल, तर आम्ही आभारी आहोत, मात्र या प्रकल्पामुळे प्रदूषणाचा व इतर त्रास परिसरातील लोकांना होऊ नये.

मा. अध्यक्षा,पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी येथे सांगितले की बैठकीत हारवित,काळसूरी, वारंग, तुरूंबाडी या गावांना प्रकल्पाचा फायदा झालेला नसून फक्त रोहिणी गावालाच फायदा झाल्याचे स्थानिकांनी मत मांडलेले आहे. तरी प्रकल्प विस्तारिकरणाबरोबरच इतर गावांच्या विकासाबाबत नियोजन करण्यात यावे अशी सूचना केली.

मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले.

**५. श्री. महेन्द्र महादेव पाटील, मुक्काम– रोहिणी, पोस्ट- मेंदडी, तालुका- म्हसळा, जिल्हा- रायगड:-**

बैठकीत चर्चा करताना असे आक्षेप नोंदविण्यात आला की या कंपनीमुळे फक्त रोहिणी गावाचाच फायदा होतो. परिसरातील इतर गावांचा सामाजिक योजना राबविताना विचार करण्यात येत नाही. तर आमची प्रकल्प प्रवर्तकांना विनंती आहे की या विस्तारिकरण प्रकल्पामुळे परिसरातील लोकांना कुठलाही त्रास होणार नाही याची काळजी कंपनी प्रशासनाने घ्यावी ही विनंती.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की गावक-यांनी कुठलाही त्रास होणार नाही, याची निश्चितच खबरदारी घेण्यात येईल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले.

**६. श्री. हरिचंद्र नथुराम लोदी, राहणार- तुरुंबाडी, पोस्ट- मेंदडी, तालुका- म्हसळा, जिल्हा– रायगड:-**

२००८ ला कंपनी आली. २०१२ साली तुरूंबाडी, आदिठाकूर, रोहिणी या गावांतील मुलांना प्रशिक्षणासाठी बेलापूरला घेऊन गेले. ड्रायव्हींग शिकण्याची इच्छा होती, कंपनीने शिकविले. तरी माझे वैयक्तिक मत आहे की येते प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात यावे. त्यामुळे स्थानिक मुलांना त्याचा फायदा होईल. स्थानिक मुले मुली शिकून त्यांना येथे रोजगार मिळेल. आज दास कंपनीने मला शिकण्याची संधी दिली. मी येथे काम करत असून माझा मुलगा इंजिनियर झालेला असून येथे दास कंपनीतच काम करत आहे. तरी विनंती आहे की येथे प्रशिक्षण केंद्र असणे आवश्यक आहे.

त्यांनी पुढे सांगितले की बैठकीत उपस्थित झालेल्या मुद्द्याप्रमाणे तुरुंबाडी येथे पाणी हा यक्ष प्रश्न आहे. महिलांना तर खूपच त्रास होतो. तरी पाण्याचा प्रश्न त्वरित मार्गी लावावा ही नम्र विनंती.

श्री. मलिक यांनी सांगितले की अशा स्वरुपाची सुनावणी ही दिघी पोर्ट बाबत झालेली होती. काही अटी व शर्ती पारित करण्यात आलेल्या होत्या. त्यात आमच्या हारवित गावाचाही समावेश होता. त्यांनी काहीही केलेले नाही. हरित लवादाने सुध्दा त्यांना निर्देश दिलेले होते, मात्र काहीही झाले नाही. अशा प्रकारच्या जनसुनावण्या होतात, प्रत्यक्षात काहीही होत नाही. तरी हारवित गावाला काय देणार, किती टक्के देणार याची माहिती द्यावी.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर गावातील आवश्यक विकासकामांचा अंदाज घेतल्यानंतर खर्च करण्याची रक्कम घोषित केली जाईल.

श्री. मलिक यांनी आक्षेप नोंदविला की कंपनीचे अधिकारी येऊन त्यांनी गावात सर्वेक्षण का केले नाही? आमच्या हारवित गावात कुठल्या नागरी सुविधांची आवश्यकता आहे याचे सर्वेक्षण का केले नाही? त्याचप्रमाणे या गावातील किती मुले कंपनीत कामाला आहेत?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सादरीकरणात सीईआर निधीची राखीव रक्कम सांगितलेली आहे. तर हारवित ग्रामपंचायतीने प्रकल्प व्यवस्थापनास एक निवेदन द्यावे. गावात आवश्यक असणा-या सामाजिक सुविधांची माहिती देण्यात यावी. जिल्हाधिकारी कार्यालयातून त्यास मान्यता घेऊन त्यानुसार रक्कम ग्रामपंचायतीस वर्ग करण्यात येईल. सध्या हारवित गावातील एक व्यक्ती प्रकल्पात कामास आहे. तो हेल्पर होता व आता प्रशिक्षण घेऊन फिटर झालेला आहे. म्हणजे त्याच्या वैयक्तिक करिअरमध्ये प्रगती झालेली आहे.

मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी आहे. त्यांनी श्री. मलीक यांना सांगितले की हारवित गावात आवश्यक असणा-या सामाजिक सुविधांबाबत ग्रामपंचायतीने प्रकल्प व्यवस्थापनास निवेदन द्यावे. कंपनी पुढील कार्यवाही करुन ते निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करेल. मा. अध्यक्षा यांनी प्रकल्प व्यवस्थापनास सूचना केली की आपणास संमत असलेला वार्षिक रकमेचा हिस्सा हा परिसरातील सर्व गावांना सारखाच ठेवण्यात यावा. त्यामुळे कोणत्याही गावाचा रोष राहणार नाही.

श्री. मलिक यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की एका बाजूस दिघी पोर्ट तर दुस-या बाजूस दास कंपनी, उधाणाच्यावेळी सर्व खारे पाणी हे आमच्या शेतीत घुसते. जरी बांध बांधण्याचे काम चालू असले तरी ते किती दिवस टिकेल याची शाश्वती नाही. दोन्ही बाजूच्या बंदरामुळे आमचा गावातील ९९ % शेती व बोअरवेल हे खा-यापाण्यामुळे नष्ट झालेली आहेत. अध्यक्षा यांनी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना उत्तर देण्याची सूचना केली.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की ज्याठिकाणी भराव टाकण्यात आलेला आहे, तो एमएमबीने विहित केलेल्या जागेतच बांधण्यात येत आहे आणि प्रस्तावित प्रकल्प हा त्याला लागूनच असलेल्या हद्दीतच विकसित करण्यात येणार आहे. त्यामुळे त्याच्यावर काय परिणाम होईल, समुद्राचे पाणी वाढेल किंवा कमी होईल, जे भरती-ओहोटीनुसार होतच असते, पण आपण सूचित केल्याप्रमाणे ते तपासण्यात येईल.

त्यावेळी मा. अध्यक्षा,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी हारवित गावाला आपला भराव आहे का याबाबत विचारणा केली. पर्यावरण सल्लागार यांनी नकारात्मक उत्तर दिले. अध्यक्षा यांनी ह्याच उत्तराची अपेक्षा होती असे सांगितले.

मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे खारबंड योजना आहेत काय याबाबत विचारणा केली. त्यांनी सांगितले की श्रीवर्धन तालुक्यात बरेच

खारलँड योजना चालू आहेत. ब-याच बंधा-यांना नैसर्गिक आपत्ती शिषर्काखाली आर्थिक मदत करण्यात आलेली आहे. तरी ही बाब येथील तहसीलदार तपासतील. त्याचपमाणे त्यांनी स्वत: कार्यकारी अभियंता, खारलँड यांच्याबरोबर हारवित गावातील प्रश्नांविषयी चर्चा करण्याचे आश्वासन दिले. भराव टाकल्यामुळे पाण्याचा जो दाब हारवित गावात येते, ते तपासण्यात येईल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांचे त्याचप्रमाणे, तहसीलदार, पोलिस प्रशासन, कंपनीचे अधिकारी, पत्रकार, मिडिया याचे जनसुनावणीस उपस्थित राहिल्याने आभार मानले. सदस्य यांनी स्थानिकांचे आभार मानताना सांगितले की, स्थानिकांनी येथे प्रश्न मांडले. त्यास उत्तर देण्याचा प्रयत्न कंपनी प्रशासन व पर्यावरण सल्लागार यांनी केला. स्थानिकांनी चर्चेत सांगितले की येते स्थानिकांनी सूचना केली की येथे फक्त रोहिंणी गावाचा विचार करण्यात आलेला आहे. तरी बैठकीत मा. अध्यक्षा यांनी सूचना केल्याप्रमाणे इतर गावांनाही समान निधी खर्च करण्यात यावा.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सुनावणीमध्ये उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याची इतिवृत्तात नोंद घेण्यात येईल व प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत मा. अध्यक्षा यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या तर्फे पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ञ समिती पुढील निर्णय याबाबत घेईल. सदस्य यांनी मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्यातर्फे जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेल्या एकूण **दोन** लेखी सूचना सोबत जोडलेले आहेत.

**(सौ. इंदिरा गायकवाड)**

आयोजिका,

पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती

तथा

उप प्रादेशिक अधिकारी,

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड

**(विद्यासागर किल्लेदार)**

सदस्य,

पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती

तथा

प्रभारी प्रादेशिक अधिकारी,

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड

**(डॉ. पद्मश्री बैनाडे)**

अध्यक्षा,

पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती

तथा

अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,

जिल्हा-रायगड